## विभाग तिसरा:

## राजकीय भूगोल मधील सिद्धांत

---

3.1 मर्मभूमी किंवा हृदयस्थल सिद्धांत: हॉलफोर्ड जॉन मॅकिंडर (Hartland Theory - Halford John Mackinder)

3.2 कडाभूमी/'किनारभूमी सिद्धांत: निकोलस जॉन स्पाइकमन (Rimland Theory- Nicholas John Spykman)

---

### **3.1 मर्मभूमी किंवा हृदयस्थल सिद्धांत: हॉलफोर्ड जॉन मॅकिंडर** (Hartland Theory - Halford John Mackinder)

**जीवन परिचय :-** हॅलफोर्ड जे. मॅकींडर (Halford J Mackinder) हे सुप्रसिद्ध ब्रिटीश भूवैज्ञानिक होते. १८६१ ते १९४७ असा त्यांचा जीवनकाल होता. ह्या अष्टपैलु व्यक्तीमत्वाची ब्रिटीश भूवैज्ञानिकांमध्ये एक व्यावहारीक व अंतिचतुर व्यक्ती म्हणुन ख्याती होती. १८८७ मध्ये इंग्लडमधील ऑक्सफोर्ड विद्यापीठात भूविज्ञानाचे पहिले प्रपाठक म्हणुन वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षीच मॅकींडर यांची नियुक्ती झाली हा त्यांचा मोठा सन्मान होता. प्रपाठक व प्राध्यापक म्हणुन अध्यापन कार्य करत असतांनाच 'युनिव्हर्सिटी कॉलेज रीडिंग येथे १८९२ ते १९०३ या काळात त्यांनी प्राचार्य म्हणून कारभार पाहिला. याचवेळी म्हणजे १८८७ ते १९०५ याकाळात नोकरी करत असतांनाच मॅकींडर यांनी ' Oxford School of Geography' ची स्थापना करून भूविज्ञानाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केलेत. १८९९ साली त्यांना प्रपाठक पदावरून प्राध्यापक (Professor) पदी बढती मिळाली. १९०५ ते १९०८ या काळात यानी लंडन विद्यापीठात 'लंडन स्कूल ऑफ इकॉनोमिक्स' चे संचालक पदही भूषविले आहे. केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर मॅकींडर यानी राज्यकारभारात आपल्या बुद्धीची चुणूक दाखविली आहे. १९९० ते १९२२ या काळात त्यांनी पार्लमेंटचे सदस्य म्हणून इंग्लंडच्या

राज्यकारभारातही भरीव योगदान दिले. काही काळ इंग्लंडचे Privy Counsellor तसेच इपीरियल शिपिंग कमिटीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. अशा बहुश्रुत व अष्टपैलू व्यक्तीमत्वाचे अनेक लेख व ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. 'The Geography of Britain and British Seas', 'The Geographical pivot of History," आणि 'Democratic Ideals and Reality' हे त्यांचे काही महत्वाचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. यातील 'The Geographical Pivot of History' 'इतिहासाचे भौगालिक ह्दयस्थल हा त्याचा सर्वात महत्वाचा व जगात सर्वत्र गाजलेला ग्रंथ आहे. यातील 'ह्दयस्थल' (Heartland) संकल्पनेमुळे मॅकीडर यांना जागतिक प्रसिद्धी मिळाली होती. अशा प्रकारे मॅकीडर यांनी स्वत: इतिहासाचे अभ्यासक असुनही त्यांनी इंग्लंडमध्ये भूविज्ञानाचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करून या विषयाला विशिष्ट स्थान प्राप्त करून देण्याचे कार्य करते, अतिशय व्यवहारचतुर व अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेल्या मॅकींडर यांनी 'मर्मभूमी सिद्धांत' (Heartland Theory) मांडला. त्याचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे...

**मॅकींडरचा मर्मभूमी /ह्दयस्थल सिध्दांत (Mackinder's Heartland Theory)**

**२५ जानेवारी १९०४** रोजी मॅकींडर यांनी रॉयल जिओग्राफिकल सोसायटी समोर आपले एक विचारपत्र **'The Geographical Pivot of History** (इतिहासाचे भौगोलिक आधार क्षेत्र) सादर केले. यात

(i) युरोपियन संस्कृतिचा उदय आशियाई आक्रमणातुन झाला आहे.

(ii) आशियातील स्टेपीज प्रदेशातुन अनेक जाती वर्णाचे लोक उराल व कॅस्पियन मधील मार्गाने आलेत.

(iii) याचा प्रभाव केवळ युरोपवरच नाही तर तत्कालीन जगातील सीमावर्ती देशांवर झाला. उदा. भारत, चीन, इराक, इराण, इत्यादी.

(iv) हे लोक ज्या स्टेपीज गवताळी प्रदेशातून आलेत त्या गवताळी मैदानी प्रदेशात घोडे व उंट हेच वाहतुकीची साधने होती.

(v) याच लोकांनी मध्यपूर्व, दक्षिण व

(vi) पूर्व आशिया तसेच युरोपियन इतिहासाला प्रभावित केले असे विचार मॅकींडर यांनी मांडलेत.

The Geographical Pivot of History' या ग्रंथात मॅकींडर यांनी जे विचार मांडलेत त्यातील काही महत्वाचे मुद्दे पुढील प्रमाणे...

I. प्रवासाचे युग संपुष्टात आले असुन आता कोणताही भूभाग शोधुन काढायचा राहिला नाही.

II. भविष्यात भूसत्ता निर्णायक ठरेल.

III. युरोप, आशिया व आफ्रिका हा जगातील सर्वांत मोठा भूखंड आहे. याच्या मध्यवर्ती असलेल्या भुप्रदेशाला भूराजनीतीच्या दृष्टीने महत्व आहे.

IV. मर्मभूमीमध्ये एक विस्तृत क्षेत्र असून ते सागरी शक्तीच्या आवाक्या बाहेर आहे.

V. या क्षेत्रात परिवर्तन होत असुन त्यात मध्यवर्ती युद्धनितीची स्थिती प्राप्त झाली आहे.

VI. मर्मभूमीच्या बाहेरील भागात खंडांच्या सीमेवर एक चंद्रकोरी सारखा भाग आहे. याच्या बाहेरील भागात. ब्रिटन, संयुक्त राज्य संस्थाने. जपान ही परकीय सत्ता आहे.

VII. आधार / धुराग्र / कील राज्याचे (Pivot State) शक्ती संतुलन अनुकूल असल्यास त्या शक्तीचा प्रसार युरोप व आशिया याच्या सीमेवरील भूप्रदेशात होईल.

VIII. सागरापलीकडील शक्तीने फ्रान्स, इटली, भारत, कोरीया या भागात सैन्य सुसज्ज ठेवले पाहिजे. यामुळे 'कील' राष्ट्राच्या मित्र राष्ट्रांना त्याच्या शक्ती विकासात अडथळा निर्माण करता येऊ शकेल व त्यांचे लक्ष महासागरी आरमारावर केंद्रीत करता येईल.

यानंतर **१९१९** मध्ये मॅकींडर यांनी 'लोकतंत्रात्मक आदर्श आणि वस्तुस्थिती (**Democratic Ideals and Reality**) हा ग्रंथ प्रकाशित केला. याच ग्रंथात त्यांनी मर्मभूमी / हृदयस्थल (**Heart Land**) या शब्दाचा सर्वप्रथम प्रयोग केला. या ग्रंथात मॅकींडर यांनी जो मर्मभूमी सिद्धांत मांडला तो सारांशरूपाने पुढील प्रमाणे :

"Who rules **East Europe** commands the **Heartland.**
(जो पूर्व युरोपवर राज्य करेल तो हृदयस्थलावर हुकुमत गाजवेल)
Who rules the **Heartland** commands the **world Island**.
(जो हृदयस्थलावर राज्य करेल तो जगद्वीपावर हुकुमत गाजवेल)
Who rules the **world Island** commands the **World**".
(जो जगद्वीपावर राज्य करेल तो जगावर हुकुमत गाजवेल)


या तीन ओळीत मॅकींडर यांनी मर्मभूमी सिध्दांत गुंफला. यात त्यांनी जगाचे राजकीय स्वरूप व त्या आधारे भविष्यकालीन शक्तीशाली क्षेत्राचा उल्लेख केला आहे. हे शक्तिशाली क्षेत्र म्हणजे 'मर्मभूमी' अशी असेल की जेथे नाविक शक्तीचा प्रभाव नसेल.

मॅकींडर यांचा मर्मभूमी सिध्दांत समजावुन घेण्यासाठी त्यांनी सांगितलेल्या East Europe, Heartland व World Island ह्या तीन क्षेत्रांचा अर्थ समजून घेणे योग्य ठरेल.

**East Europe** 'पूर्व युरोप'**: -** 'मर्मभूमी' सभोवताली, असलेल्या युरेशियाच्या भागाला त्यांनी 'पूर्व युरोप' (East Europe) असे संबोधले. यात फिनलंड, स्विडन, जर्मनी, मुख्य हंगेरी, युगोस्लाव्हिया, पोलंड, रूमानिया, ऑस्ट्रिया, स्वित्झलंड, बल्गेरिया, बाल्टिक इत्यादी क्षेत्रांचा समावेश होतो.

**Heartland** 'मर्मभूमी":- लष्करी डावपेचाच्या दृष्टीने अतिशय सुरक्षित व अभेद्य असा प्रदेश म्हणजे 'मर्मभूमी" (Heartland) होय. मर्मभूमी अभेद्य असल्यामुळे कोणत्याही शत्रुराष्ट्राला किंवा नाविक शक्तीला त्यावर आक्रमण करून तो प्रदेश जिंकणे किंवा ताब्यात घेणे अशक्य असते असे मॅकींडर यांनी म्हटले आहे.

**World Island जगदीप: - आशिया, आफ्रिका व युरोप** ह्या तीन भूमीखंडास एकत्रितरित्या जगदीप (World Island) असे म्हटले आहे. याच जगदीपात मॅकींडर यांना 'मर्मभूमी' (Heartland) असल्याचे अभिप्रेत आहे.




**'मर्मभूमीचा' विस्तार:-**

मॅकींडरला अभिप्रेत असलेल्या मर्मभूमीचे स्थान युरोशियाच्या उत्तरमध्य व पश्चिम भागात असुन उरल पर्वतावरून वाहत येणाऱ्या अनेक लहान मोठ्या नद्या याच भागातुन वाहात जाऊन एक तर गोठलेल्या आर्क्टिक महासागरास किंवा खंडातर्गत असलेल्या खाऱ्या पाण्याच्या समुद्रास किंवा गोड्या पाण्याच्या सरोवरास जाऊन मिळतात. हा विस्तार **उत्तरेकडील आर्क्टिक महासागरापासुन**

**दक्षिणेस इराणच्या पठारापर्यंत** तर **पश्चिमेस व्होल्गा नदी खोऱ्यापासुन सायबेरियातील लेना (Lena) नदीच्या खोऱ्यापर्यंत** असल्याचे मॅकींडर यांनी वर्तविले आहे. ही मर्मभूमी विस्तृत मैदानी व साधनसंपत्तीने समुद्ध असुन बाह्य आक्रमणापासुन सुरक्षित आहे. त्यामुळे या मर्मभूमी प्रदेशात बाह्य शक्तींचा प्रवेश होणे अशक्य आहे. बाह्य आक्रमणापासुन सुरक्षित असल्यामुळे मर्मभूमीत बलाढ्य व शक्तीशाली सत्ता स्थापन होऊन ती अभेद्य राहिल. ह्या मर्मभूमीत सागरीमार्गाने प्रवेश करणेही कठीण होईल. कारण या भागातील नद्या एक तर गोठलेल्या आर्क्टिक महासागराला मिळतात किंवा खंडातर्गत "असलेल्या समुद्र किंवा सरोवरांना जाऊन मिळतात असे मत मॅकींडर यांनी मांडले आहे.

थोडक्यात, मॅकिंडर यांच्या मते, मर्मभूमीचा विस्तार अधिक असल्यामुळे तेथे नैसर्गिक साधनसंपत्ती विपूल असून कोणत्याही बाह्य शक्तीला शिरकाव करणे किंवा नौदलाच्या माध्यमातुन मर्मभूमीची कोंडी करणे अशक्य आहे. म्हणुन ही मर्मभूमी सर्वात बलाढ्य सत्ता म्हणून उदयास येऊन तिची संपूर्ण जगावर सत्ता असेल.

मॅकींडर यांनी आपला मर्मभूमी सिद्धांत १९०४ साली मांडला. नंतर पहिल्यांदा १९१९ साली मर्मभूमीचा विस्तार वाढवुन त्यात तिबेटचे पठार, मंगोलिया, मायनर आशिया, मध्य व निम्म डॅन्यूबचे क्षेत्र इत्यादी प्रदेशाचा समावेश केला. याचवेळी त्यांनी मर्मभूमी किंवा ह्दयस्थल (Heartland) हा शब्दप्रयोग सर्वप्रथम केला. यानंतर १९४३ साली "The Round World and the Winning of the Peace" हा जागतिक सामरिक महत्वांच्या संदर्भातील ग्रंथ प्रकाशित केला त्यावेळी दुसऱ्यांदा विचारात बदल केला. यावेळी त्यांच्या मुळ सिद्धांतात कोणताही बदल होऊ न देता त्यांनी मर्मभूमीत मान्सुन आशियाई प्रदेशाचा समावेश करून मर्मभूमीच्या विस्तारात वाढ केली म्हणजे त्यांनी सुरूवातीला प्रतिपादन केलेले स्थल शक्ती महात्म्य बदलवून त्यात नैसर्गिक साधनसंपत्ती, अंतर्गत वाहतुक व्यवस्था, लोकसंख्या यावर आधारीत शक्तीकेंद्र विशद केल्याचे दिसुन येते.

**मॅकींडरच्या मर्मभूमी सिद्धांतावरील टिका/ आक्षेप :**

मॅकींडरने मर्मभूमी (Heartland) संदर्भात सादर केलेले विचार सुरूवातीपासुनच विवादास्पद राहिले. अनेक विचारवंतांनी या विचारांवर तार्किक दृष्टीकोनातुन तर काहींनी राजकीयदृष्टीने टिकात्मक विचार मांडलेत. त्यापैकी काही टिका पुढील प्रमाणे....

**१) नाविक शक्तीला महत्व :-** मॅकींडर यांनी 'Heartland' मर्मभूमीसंदर्भात विचार मांडलेत. त्यावेळी सामुद्रिक शक्तीला विशेष महत्व होते. नौदलाच्या बळावरच तेव्हा ब्रिटीशानी त्यांचा साम्राज्य विस्तार केला होता. त्यामुळे मॅकीडर यानी नाविक शक्ती / नौदलास अत्याधिक महत्व दिले होते. परंतु जे क्षेत्र नौदलाच्या आक्रमणापासुन सुरक्षित असेल तेच क्षेत्र भविष्यात शक्तीस्थल म्हणून निर्माण होऊ शकेल असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

**२) हवाई शक्तीकडे दुर्लक्ष:** मॅकींडर यांनी हवाई शक्तीचा थोडासुद्धा विचार केलेला दिसत नाही. नाविक शक्तीच्या आक्रमणापासुन सुरक्षित असलेले क्षेत्र हवाईशक्तीच्या आक्रमणापासुन सुरक्षित असेलच असे नाही. तर हवाई दलाच्या माध्यमातून कोणत्याही क्षेत्रावर आक्रमण करणे शक्य असते. याचा मॅकींडर यांनी विचारच केलेला नाही.

**३) आधुनिक क्षेपणास्त्रे :** आधुनिक अणुयुगाच्या काळात दूर अंतरावरून मारा करू शकणारी क्षेपणास्त्रे निर्माण झाली आहेत. अशा क्षेपणास्त्रांपासुन मर्मभुमी सुरक्षित राहिल असे मानणे विवादास्पद ठरेल. अणुबॉम्ब, रडार, रॉकेट या प्रकारच्या आधुनिक क्षेपणास्त्राचा मॅकीडरने विचार केलेला नाही.

**४) मर्मभूमी व शक्तीसंतुलन या परस्पर विरोधी कल्पना :-** मर्मभूमी (Heartland) असलेला प्रदेश बाह्य आक्रमणापासुन सुरक्षित व अभेद्य असतो व ती जगातील सर्वश्रेष्ठ सत्ता असते असे मॅकीडरने प्रतिपादन केले आहे. तर दुसरीकडे ब्रिटनच्या नाविक दलास मर्मभूमीतील सोविएट रशियाचा धोका असल्याची भिती व्यक्त केली आहे. याचप्रमाणे मर्मभूमी बाहेरील जपान व ब्रिटन यांनाही सोविएट

रशियाच्या आक्रमणापासुन सावध राहण्याचा इशारा दिला आहे. याचाच अर्थ मॅकीडर याना विश्व शक्तीचे संतुलन अपेक्षित असल्याचे दिसते. यावरून त्याच्या विचारात ठामपणाचा अभाव दिसुन येतो.

**५) अर्धचंद्राकार भूमीतील देशांचे बदलते स्वरूप :-** आधार / धुराग्र (Pivot Area) क्षेत्राच्या पुर्व, पश्चिम व दक्षिणेस असलेल्या सीमावर्ती प्रदेशांना मॅकींडर यांनी अंतर्गत अर्धचंद्राकृती भूमी (Inner Crescent Land) असे म्हटले आहे. भारत, चीन, जर्मनी, ऑस्ट्रिया, पुर्व व पश्चिम आशियातील काही देशांचा समावेश होतो. यातील चीन व भारत यांची आजची राजकीय स्थिती पूर्वीपेक्षा खूप बदललेली आहे. चीन एक शक्तीशाली राष्ट्र म्हणून पुढे आले आहे. तसेच भारतही आशियातील राजकीयदृष्ट्या एक प्रबळ शक्ती म्हणून ओळखला जातो. म्हणजेच मॅकींडरच्या मर्मभूमीचे महत्व काळाच्या ओघात कमी झाले आहे.

**६) आर्क्टिक महासागराचे महत्व :-** आर्क्टिक महासागर गोठलेल्या स्थितीत असल्यामुळे जलवाहतुकीच्या दृष्टीने तो उपयुक्त नसल्याचे मॅकींडरने म्हटले आहे. परंतु हवाई वाहतुकीच्या संदर्भात ऑर्क्टिक महासागराचे महत्व वाढले आहे. हवाई वाहतुकीमुळे मर्मभूमी व अमेरीका यांच्यातील अंतर कमी झाल्यामुळे धोका निर्माण झाला आहे.

**७) मर्मभूमीचे विभाजन :-** मॅकींडरच्या मर्मभूमीचे म्हणजेच सोविएट रशियाचे विभाजन झाल्यामुळे एका मोठ्या साम्यवादी महासत्तेचा आर्थिक व राजकीय दबदबा पूर्वीपेक्षा कमी झालेला आहे. याचा एकंदरीत परिणाम आंतरराष्ट्रीय राजनैतिक ध्येयधोरणांवर झालेला दिसुन येतो.

अशा प्रकारे अनेक विद्वानानी मॅकीडरच्या मर्मभूमी सिद्धांतावर टिका केली आहे. परंतु याचा अर्थ 'मर्मभूमी सिद्धांत' महत्वाचा नाही असे नसुन या सिद्धांतातील विचार आजही महत्वपुर्ण वाटतात. त्यांनी जे विचार मांडलेत ते तत्कालीन परिस्थितीला अनुसरून तर्क सुसंगत होते. 'विश्व सामरिकता' (Global Strategic) या दृष्टीकोनातुन मॅकींडरचे विचार आजही महत्वपूर्ण आहेत.

**3.2 कडाभूमी/'किनारभूमी सिद्धांत' सिद्धांत: निकोलस जॉन स्पाइकमन** (Rimland Theory- Nicholas John Spykman)

**जीवन परिचय :** निकोलस जॉन स्पाइकमन या प्रसिद्ध अमेरीकन भूराजनीतीज्ञाचा जन्म १८९५ साली झाला. त्यांनी संयुक्त राज्य अमेरिकेतील येल विद्यापीठात (Yale University) आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयाचे प्राध्यापक व आतरराष्ट्रीय शिक्षण संस्थेचे संचालक म्हणुन महत्वपूर्ण कार्य केले आहे. ते जागतिक शांततेचे पुरस्कर्ते होते.The Geography of the Peace' या जगप्रसिद्ध ग्रंथाचे लिखाण करून राजकीय भूविज्ञानात त्यांनी मोलाची भर घातली आहे. त्यांना आंतरराष्ट्रीय संबंधामधील सत्तासमतोलाच्या डाव-प्रतिडावात व संरक्षणांच्या नियोजनाशी घनिष्ठ संबंध असलेल्या भूराजनैतिक विश्लेषणात जास्त रस होता. त्यांनी "किनारभूमी सिद्धांत" (Rimland Theory) मांडला आहे तो पुढीलप्रमाणे...

**"किनारभूमी सिद्धांत" (Rimland Theory):**

**एन. जे. स्पाइकमन** या अमेरीकन भूराजनीतीज्ञाने १९३८-३९ साली **The Geography of the Peace**' या ग्रंथाचे लेखन केले. त्यांच्या मृत्युनंतर दुसऱ्याच वर्षी म्हणजे १९४४ साली हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथात त्यांनी 'राष्ट्रीय शक्ती' (National Power), 'आंतरराष्ट्रीय शांतता' (International Peace) व 'किनारभूमी' (Rimland) ह्या तीन गोष्टी सांगितल्या. यापैकी 'किनारभूमी' यातुन त्यांनी 'किनारभूमी सिद्धांत' स्पष्ट केला आहे.

स्पाइकमन हे मॅकीडर यांच्या मर्मभूमी सिद्धांताचे पुरस्कर्ते असले तरी त्यांनी त्यावर आक्षेप घेऊन त्याच तत्वावर आधारित असलेला किनारभूमी सिद्धांत (Rimland Theory) मांडला. या सिद्धांताचा सारांश असा –

Who Controls the **Rimland** rules **Eurasia**
(जो किनारभूमीचा नियंत्रक तो युरेशियाचा अधिपती)
Who rules **Eurasia** Controls the destinies of the **World**”
(जो युरेशियाचा अधिपती तो जगाचा अधिपती')

मॅकींडरच्या "मर्मभूमी सिद्धांत" तत्वावर आधारलेला असूनही स्पाइकमन यांचा हा किनारभुमी सिद्धांत वेगळा आहे**. मॅकींडर यांनी भूशक्तीला** (Land Power) अधिक महत्व दिले आहे. तर स्पाइकमन यांनी मर्मभूमीपेक्षा किनारभुमी खरी ताकद असल्याचे सांगत नाविकदलास (Naval Power) अधिक बलशाली मानले आहे. तसेच युरेशियाची खरी ताकद मर्मभूमीत नसुन किनारभूमीत असल्याचे स्पष्ट केले आहे. स्पाइकमन यांनी मॅकींडरच्या मर्मभूमीसभोवताली असलेल्या अंतर्गत अर्धचंद्राकार भूमीला (Inner Cresence Land) किनारभूमी म्हटले आहे. किनारभूमीत सागर किनारीय युरोप, मध्य पूर्व भारत, दक्षिण - पूर्व आशिया, चीन, कोरीया या देशांचा समावेश केला आहे. या प्रदेशात अधिक लोकसंख्या, मुबलक साधनसंपत्ती, जलवाहतुक सुविधा उपलब्ध आहेत. स्पाइकमन यांनी मर्मभूमी म्हणजेच भूसत्ता व नाविक शक्ती म्हणजेच सागरीसत्ता (ग्रेट ब्रिटन, जपान) यांच्यात उद्भवणाऱ्या संघर्षाचे अंतस्थ क्षेत्र (Buffer Zone) म्हणून किनारभूमीला संबोधले आहे.. पूर्व आशियाई किनाऱ्यापासून विभक्त असलेला जपान आणि पश्चिम युरोपच्या किनाऱ्यापासून विभक्त असलेला ग्रेट ब्रिटन या दोन राज्यसंस्था 'किनारभूमी' बाहेरील शक्ती केंद्रे असून त्यांनाच स्पाइकमन यांनी युरेशिया संबोधले आहे. युरेशियाची खरी ताकद ही मर्मभूमीत नसुन किनारभूमीत असल्याचे स्पाइकमनने म्हटले आहे.

स्पाइकमन यांनी सांगितलेल्या किनारभूमीत समाविष्ट असलेल्या सर्व देशांना भूभागा सोबतच सागरी किनाराही लाभलेला आहे. त्यामुळे याठिकाणी स्थल व जल, भूमी व सागरी अशा दोन्ही शक्तींच्या विकासात खुपच बाव आहे अशा किनारभुमीवर ज्या राज्यसंस्थेची सत्ता असेल तिच

राज्यसंस्था जगातील बलाढ्य सत्ता असेल. तसेच ऑस्ट्रेलिया व आफ्रिका हे भूमीखंड किनारभूमीपासुन दूर असुन ऑस्ट्रेलिया आशियाच्या भुमध्य सागराने, आग्नेय आशिया व आस्ट्रेलिया दरम्यान असलेले सर्व समुद्र संयुक्तरित्या युरेशियाच्या आग्नेय प्रदेशाशी तर आफ्रिका भुमध्य समुद्राने दक्षिण व नैऋत्य युरेशियाशी जोडलेला आहे. त्यामुळे आग्नेय आशिया व युरेशियाच्या भुमध्य समुद्रावर ज्या राज्यसंस्थाची सत्ता असेल त्याच राज्यसंस्थेची अधिसत्ता ऑस्ट्रेलिया व आफ्रिकेवर राहील.

संयुक्त राज्य अमेरिकेच्या संदर्भात संरक्षण व लष्करी डावपेचाच्या दृष्टीने संयुक्त राज्य अमेरिकेचे स्थान आदर्श आहे. तरी किनारभूमीतील राज्यसंस्थावर सोविएट रशियाचे वाढते नियंत्रण अमेरिकेला धोकादायक असल्यामुळे अमेरिकेने किनारभूमीवर (जर्मनीवर) सतत नियंत्रण ठेवून आपल्याविरूद्ध कोणतीही शक्तीशाली राजकीय संघटना निर्माण होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच किनारभूमीत जर्मनीच्या वाढत्या विस्तारवादी धोरणापासुन मर्मभूमीतील प्रबळ सत्ता असलेल्या रशियाला व नंतर संयुक्त राज्य अमेरिकेलाही धोका असल्याचे वर्तविले आहे. त्यामुळे संयुक्त संस्थाने, ग्रेट ब्रिटन व रशिया या सागरी व भुसत्ता असलेल्या शक्तींना परस्पर मैत्रीचे संबंध ठेवून प्रसंगी जर्मन शक्तीला शह देण्यासाठी एकत्र येण्याची गरज असल्याचे म्हटले आहे.



**स्पाइकमनच्या किनारभूमी सिद्धांतावरील टिका/ आक्षेप :**

१) किनारभूमीतील अनेक देश राजकीय दृष्ट्या व प्राकृतिक साधनसंपत्तीने संपन्न आहेत परंतु हे सर्व देश एकाच शक्तीच्या अधिपत्याखाली येणे अशक्य आहे. त्यामुळे किनारभूमीचे क्षेत्र शक्तीशाली होऊ शकणार नाही.

२) किनारभूमी क्षेत्रावर दोन्ही बाजुंकडुन म्हणजे मर्मभूमी कडून आणि अमेरिका, ब्रिटन व जपान ह्या बाह्यशक्ती कडूनही आक्रमण होऊ शकते.

३) या प्रकारे जगातील एखादी अति प्रबळ शक्ती किनारभूमीवर अधिकार प्राप्त करेल तर ती शक्ती संपूर्ण जगावर नियंत्रण प्राप्त करू शकेल यात शंका नाही.

४) ज्या प्रमाणे मर्मभूमी स्वतः जगदीपावर नियंत्रण प्राप्त करू शकत नाही. त्याच प्रमाणे किनारभूमी देखील नियंत्रण ठेवू शकत नाही. कारण प्रत्यक्षात किणारभुमीच संघटीत राहू शकणार नाही.

स्पाइकमनच्या किनारभूमी सिद्धांतामध्ये काही त्रुटी असल्या किंवा त्यावर आक्षेप घेतले जात असले तरी तत्कालीन परिस्थितीवर तो आधारीत होता. स्पाइकमन स्वत: आंतरराष्ट्रीय शांततेचे पाईक व पुरस्कर्ते होते. त्यांची 'जागतिक शांतता व सत्ता समतोल' ची कल्पना मात्र आजही महत्वपूर्ण आहे.

## विभाग तिसरा: राजकीय भूगोल मधील सिद्धांत

**प्र. 1) खालील प्रश्नांसाठी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१.हॅलफोर्ड मॅकिंन्डर यांनी कोणता सिध्दांत मांडला

**अ) ह्रदयस्थल (Heartland)**ब) किनारभूमी क) लोकसंखेचा ड) वरीलपैकी नाही

२.ह्रदयस्थल सिध्दांत (Heartland Theory) कोणी मांडला

**अ) हॅलफोर्ड मॅकिंन्डर** ब) स्पाईकमन क) रॅटझेल ड) हार्टशोन

३.मॅकिंन्डर यानी कोणत्या वर्षी ह्रदयस्थल संकल्पना जगापुढे मांडली

**अ) १९१९** ब) १९२० क) १९२२ ड) १९२१

४.Geographical pivot of history हा ग्रंथ कोणी लिहिला

अ) हार्टशोन ब) स्पाईकमन क) रॅटझेल **ड) हॅलफोर्ड मॅकिंन्डर**

५.लोकशाहीचे आदर्श व वास्तवता (Demographical Ideas & Reality ) हा ग्रंथ प्रकाशित कोणी केला

अ) स्ट्राबो **ब) हॅलफोर्ड मॅकिंन्डर** क) रॅटझेल ड) ॲरिस्टॉटल

६.जो जगदिपावर (World Island) राज्य करील तो जगावर हुकूमत गाजवेल असे कोणी म्हणाले

**अ) मॅकिंन्डर** ब) स्पाईकमन क) स्ट्राबो ड) ॲरिस्टॉटल

७.जो पूर्व युरोप वर राज्य करेल तो ह्रदयस्थलावर आधिपत्य गाजवेल. जो ह्रदयस्थलावर राज्य करेल तो जगदिपावर आधिपत्य गाजवेल. जो जगदिपावर राज्य करेल तो संपूर्ण जगावर आधिपत्य गाजवेल असे कोणी सांगितले

अ) स्ट्राबो ब) स्पाईकमन **क) मॅकिंन्डर** ड) वरीलपैकी नाही

८.मॅकिंन्डर यांनी जगदिपामध्ये( World Island) कोणत्या तीन भूमी खंडाचा समावेश केला

**अ) आशिया, आफ्रिका, युरोप** ब) उ. अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया

क) अंटार्टिका ऑस्ट्रेलिया युरोप ड) वरीलपैकी नाही

९.ह्रदयस्थल / मर्मभूमीचा विस्तार उत्तरेस कोणत्या महासागरापासून दक्षिणेस इराणच्या पठारापर्यंत आहे

अ) पॅसिफिक ब) हिन्दी क) अटलांटिक ड) आर्क्टिक

१०.ह्रदयस्थल / मर्मभूमीचा विस्तार पश्चिमेस कोणत्या नदीपासून पूर्वेस लेना नदीपर्यंत आहे

अ) नाईल **ब) होल्गा** क) मिसीसीपी ड) गंगा

११.रिमलॅड ही संकल्पना कोणी मांडली

अ) अल्फ्रेड वेगनर ब) मॅकिंन्डर क) स्ट्राबो **ड) स्पाईकमन**


*प्रा.डॉ. एन.के.बनसोडे, भूगोल विभाग, भोगावती महाविद्यालय,कुरुकली*

१२.स्पाईकमन यांनी कोणता सिध्दांत मांडला

अ) हृदयस्थल (Heartland) **ब) किनारभूमी (Rimland)** क) सामाजिक

ड) यापैकी नाही

१३.जो रिमलॅंड वर अधिकार गाजवेल, तो युरेशियावर राज्य करेल, जो युरेशियावर राज्य करेल तो जगाचा अधिपती होतो असे कोणी सांगितले

**अ) स्पाईकमन** ब) मॅकिंन्डर क) महान ड) कोहेन

14. )स्पाईकमन यांनी कोणत्या वर्षी American strategy in world politics हा ग्रंथ लिहिला.

अ) १९४० **ब) १९४२** क) १९४४ ड) १९४६

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी दिलेल्या Question Bank मधील प्रश्न

**प्र. 1) खालील प्रश्नांसाठी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

1. हृदय स्थल संकल्पना कोणी मांडली?

**अ) मॅकिंडर** बब्लाश (ॲरिस्टॉटल ड (स्पाईकमेन क (

2. हृदयस्थल सिद्धांतात खालीलपैकी कोणाचा नवीन जगात समावेश नाही?

अउत्तर अमेरिका ( ब दक्षिण अमेरिका (बेटे क (**डयुरोप (**

3. हृद्यस्थलाचा विस्तार दक्षिणेस कुठेपर्यंत आहे?

अ) आर्क्टिक महासागर **ब) इराणचे पठार** क) व्होल्गा नदी ड) लेना नदी

4. स्पाईकमन यांनी कोणती संकल्पना मांडली?

**अ) रिमलैंड** ब) आदर्श राज्य क) हृदयस्थल (ड) यापैकी नाही

5. "जो रिमलँडवर अधिकार गाजवेल तो युरोप वर राज्य करेल" असे कोणी म्हटले?

अ) मॅकिंडर **ब) स्पाईकमन** क) ॲरिस्टॉटल ड) ब्लाश

6. स्पाईकमनने कोणत्या सामर्थ्यावर भर दिला?

अ) भू ब) हवाई **क) सागरी** ड) यापेकी नाही

**प्र. 2) टिपा लिहा.**

1) मेकिंडर यांनी केलेली जगाची विभागणी

2) हृदयस्थलाचा विस्तार व महत्व

3) हृदयस्थल सिध्दांताची मध्यवर्ती कल्पना

4) रिमलैंड विषयी स्पाईकमनची मते

5) स्पाईकमनची मॅकिंडरच्या हृदयस्थलाविषयीची मते

6) रिमलँडचे महत्व

**प्रश्न प्र. 3) सविस्तर उत्तरे लिहा.**

1) हृद्य-स्थल सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

2) रिमलँड सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

**संदर्भ ग्रंथ/ Reference book**


1. एभूगोलाची मुलतत्वे :कोळेकर .एस .सवदी व पी .बी ., निराली प्रकाशन, पुणे
2. प्रा.एस. व्ही. ढाके व डॉ. व्ही. जे. पाटील: राजकीय भूगोल, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
3. प्रा. के. ए. खतीब: राजकीय भूगोल, मेहता बुकसेलर्स, कोल्हापूर
4. भागवत अ.वि. : राजकीय भूगोल, नरेंद्र प्रकाशन, पुणे
5. डॉ. घारपुरे विठ्ठल: राजकीय भूगोल, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर
6. डॉ. मगर, जयकुमार: राजकीय भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर